**Marks-80**

## विभाग 'अ'

**प्र1. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही ५)** **5**

निसर्गापेक्षा मोठा शिक्षक जगात कोठेही नाही. निसर्ग माणसाला चिंतनशील बनवतो त्याच्या लेखी प्रत्येक सजीव महत्त्वाचाच असतो.

एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. एक मनुष्य दुसऱ्याचा मालक होऊ शकतो, हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. प्रत्येकजण स्वयंभू आहे. एखादं उंच वडाचं झाड केवळ आकारानं, सामर्थ्यानं मोठं आहे, म्हणून त्याचं मोल जुईच्या फुलांपेक्षा जास्त आहे असं नाही. निसर्गाला जाती, धर्म मंजूर नाहीत मी तुझ्यापेक्षा पवित्र आहे हे सांगण्यासाठी माणसांनीच धर्म, पंथ निर्माण केले. निसर्गाला धर्म असलाच तर 'जगा आणि जगू द्या' एवढाच असू शकतो.

निसर्गाची इतकीच अपेक्षा असते की फुलं ज्या सहजपणे फुलतात, सहज रंग धारण करतात, सहजतेने विकसित होतात, त्याप्रमाणेच जीवन फुलावं. फुलण्याचा, बहरण्याचा कुणाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये. पावित्र्याच्या कल्पनेने निसर्ग बंदिस्त नाही. माणसं जर पाखरासारखी उडून जाणार असतील तर त्यांनी पाखरांसारखीच बेगमी करावी. पिढ्या न् पिढ्या आपल्या मुलांनी कोणतेही कष्ट न करता जगावं इतकी संपत्ती का जमा करावी? या विशाल धरतीवर मालकी हक्कांची कुणी कुंपणे घालू नयेत.

1) निसर्गाला कोणती गोष्ट मंजूर नाही?

अ) एक माणूस अखंड जेवतो व दुसरा संतत उपाशी राहतो.

ब) एक मनुष्य दुसरचा मालक होऊ शकतो.

क) निसर्गाला जाती, धर्म मंजूर नाहीत.

ड) वरील सर्व गोष्टी.

2) निसर्गासाठी धर्म कोणता?

अ) मानवता धर्म | ब) हिंदू धर्म

क) जगा आणि जगू द्या | ड) ख्रिश्चन व मुस्लिम धर्म

3) निसर्गाची माणसाकडून कोणती अपेक्षा आहे ?

अ) फुलांइतक्याच सहजतने जीवन फुलावे.

ब) जीवन पवित्र असावे.

क) माणसांनी चिंता करू नये.

ड) माणसांनी पाखरांप्रमाणे वागावे.

4) A. निसर्गात जुईच्या फुलाचे मोल वडाच्या झाडापेक्षा कमी नसते.

B. कारण-निसर्गात सर्व सजीव समान असतात.

अ) विधान 'A' आणि 'B' दोन्ही चूक. ब) विधान 'A' बरोबर 'B' चूक.

क) विधान 'A' आणि 'B' दोन्ही बरोबर. ड) विधान 'A' चूक 'B' बरोबर.

5) 'साठवणूक करणे' या अर्थाचा उताऱ्यात आलेला शब्द कोणता?

अ) स्वयंभू असणे ब) बेगमी करणे क) मोल असणे ड) विकसित होणे

6) 'मुक्त' या शब्दाच्या विरूध्द अर्थाचा उताऱ्यात आलेला शब्द कोणता?

अ) पवित्र ब) बंदिस्त क) कुंपण ड) चिंता

7) 'चिंतनशील' म्हणजे काय?

अ) चिंता करणारा ब) शिक्षक क) विचारवंत ड) स्वयंभू

**प्र2. पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुमार कृती करा.** **5**

1. खालील चौकटीत पोग्य शब्द लिहा.

(i) चंद्रकिरण पिअन जगणारा पक्षी : [ ]

(ii) सर्वकाळ सर्वांना सुख देणारा : [ ]

(iii) पिलांचे रक्षण करणारा : [ ]

जेवी चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवी पिलियांसी ।
जीवन पजैसे कां जीवांसी। लेवीं सर्वांसी मृत्य ॥
जळ परिवरी क्षाळी मळ । योगिया सचाहा करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।
उदकाचे मुख में किती । सर्वेधि क्षणें तृषिते होती ।
योगिया दे स्वानंइतृप्ती । सुखासी विकृती पै नाही ।।
उदकाची ने मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होव निविता सर्वेद्रियां !!
मेधमुखे अध:पतन । उदकाचे देखोनि जाण ।
अपाते निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खानुते येणे । जे इहलोकी जन्म पावणे ।
जन निववी श्रयणकीर्तन । निजज्ञाने उद्धरी ।।

2. योगी पुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.

| योगी पुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| **(i)** | |
| **(ii)** | |

3. पुढील शब्दांचा अर्थ लिहा.

(i). उदक - (ii). मधुरता - (iii). रसना -

**प्र3. क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही-४)** **4**

1) घराची <u>वाट</u> शोधताना पायांची <u>वाट</u> लागली.

(अधोरेखित शब्दांच्या जातींचा योग्य पर्याय निवडा)

अ) सामान्य नाम, क्रियापद. ब) क्रियापद, सामान्य नाम.

क) क्रियापद, क्रियाविशेषण. ड) दोन्ही सामान्य नाव आहेत.

2) खालीलपैकी योग्य विधाने कोणती?

A. शब्दांच्या जातींमध्ये अव्यय प्रकारांना अविकारी म्हणतात.

B. कारण - या शब्दांच्या जातींमध्ये लिंग, वचन, विभक्ती यांच्यामुळे बदल होत नाही.

अ) 'A' बरोबर 'B' चूक. ब) 'A, B' दोन्ही बरोबर.

क) 'A, B' दोन्ही चूक. ड) 'A' चूक 'B' बरोबर.

3) मधुराला खालील शब्दांमधून भाववाचक नामे शोधायला मदत करा.

**गोडवा, नम्रता, मित्र, चपळ, लबाडी**

अ) सर्व भाववाचक नामे आहेत.

ब) गोडवा, नम्रता, लबाडी ही भाववाचक नामे

क) गोडवा, चपळ, लबाडी ही भाववाचक नामे.

ड) चपळ, मित्र ही भाववाचक नामे.

4) विशेषनाम ----------------------- असते.

अ) व्यक्तिवाचक ब) समूहवाचक क) जातिवाचक ड) विशेषण

5) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते?

अ) पक्षी झाडावर बसला. ब) दिव्याखाली अंधार झाला.

क) गावाबाहेर जत्रा भरली. ड) तुटलेला पतंग खाली आला.

**प्र3. ख) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** **3**

1) 'सर्वकाही तुझ्या मनाप्रमाणे घडेल.' साधूने राजाला आशीर्वाद दिला .-या दोन्ही वाक्यांचा काळ ओळखा.

अ) वर्तमानकाळ, भविष्यकाळ. ब) भविष्यकाळ, वर्तमानकाळ

क) भविष्यकाळ, भविष्यकाळ ड) भविष्यकाळ, भूतकाळ

2) संकटात सापडतो तेव्हाच देवाची आठवण होते. - या वाक्याच्या भविष्यकालीन वाक्याचा पर्याय शोधा.

अ) संकटात सापडू तेव्हाच देवाची आठवण होईल.

ब) संकटात सापडलो तेव्हाच देवाची आठवण झाली.

क) संकटात सापडतो आहोत म्हणून देवाची आठवण होत आहे.

ड) संकटात सापडत होतो तेव्हा देवाची आठवण आली होती.

3) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडू लागला. (या वाक्याचा वर्तमानकाळी वाक्याचा योग्य पर्याय निवडा)

अ) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडेल.

ब) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडावा.

क) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडत आहे.

ड) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडला.

4) माणसाने नेहमी माणुसकी जपावी. (या वाक्याचा भूतकालीन वाक्याचा योग्य पर्याय लिहा)

अ) माणूस नेहमी माणुसकी जपेल.

ब) माणूस नेहमी माणुसकी जपतो.

क) माणूस नेहमी माणुसकी जपत आहे.

ड) माणसाने नेहमी माणुसकी जपली.

**प्र3. ग) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** **3**

1) खालीलपैकी आज्ञार्थी वाक्य कोणते?

अ) सत्य सदा बोलावे.
ब) देवा, माझ्या पोराला यश दे!
क) रोज नवीन काहीतरी शिकले पाहिजे ना?
ड) आम्ही वर्गात शांतता राखतो.

2) निराश होण्याचे काय कारण? या वाक्याच्या विधानार्थी वाक्याचा योग्य पर्याय खालीलपैकी कोणता?

अ) निराश होऊ नको.
ब) निराश होण्याचे काही कारण असावे ना?
क) किती ते निराश व्हायचे!
ड) निराश होण्याचे काही कारण नाही.

3) फुकट दिले तर कोण नको म्हणेल? या वाक्याच्या विधानार्थी नकारात्मक रूपांतराचा योग्य पर्याय निवडा.

अ) फुकट दिले तर सर्वजण घेतील.
ब) फुकट दिले तर सर्वांनाच हवे असते.
क) फुकट दिले तर कोणी नको म्हणणार नाही.
ड) फुकट दिले तरी कोणालाही नको असेल.

4) मोठ्यांचा अनादर करू नये - विधानार्थी होकारात्मक वाक्याचा योग्य पर्याय निवड.

अ) लहानांचा आदर करावा.
ब) मोठ्यांचा आदर करावा.
क) मोठ्यांचा अनादर करावा.
ड) मोठ्यांचा सादर करावा.

**प्र3. घ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **2**

1) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

अ) धेनु - धरती. ब) उदक - उदर.

क) ऊब - आग ड) प्रण- प्रतिज्ञा.

2) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) मेघ ब) जल क) घन ड) पयोधर

3) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) मित्र ब) रवी क) भास्कर ड) शत्रू

**प्र4. क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **2**

1) खालीलपैकी विरुध्दार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

अ) उत्साही x आळस ब) उपद्रव x निरुपद्रवी

क) कीर्ती x प्रसिद्धी ड) मैत्री x शत्रुत्व

2) 'देशभक्त' या शब्दाच विरुध्द अर्थाचा योग्य शब्द निवडा.

अ) देशप्रेम ब) देशद्रोह क) देशवासी ड) देशद्रोही

3) 'स्तुती' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

अ) कौतुक ब) प्रशंसा क) निंदा ड) स्थिती

**प्र4. ख) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **2**

1) खालीलपैकी भिन्न लिंगी शब्दाचा पर्याय ओळखा.

अ) सांडणी ब) लांडोर क) कोकीळ ड) सिंहीण

2) लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.

अ) पक्षी ब) आकाश क) इंद्रधनुष्य ड) तारांगण

3) खालीलपैकी पुल्लिंगी शब्द कोणता?

अ) नदी ब) सरोवर क) ढग ड) पाणी

**प्र4. ग) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **2**

1) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता?

अ) भाऊ ब) कागद क) दिवस ड) रात्र

2) खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द कोणता?

अ) वासरू ब) कोकरू क) पाखरू ड) अश्रू

3) 'वाट' या शब्दाचे योग्य अनेकवचनी रूप कोणते?

अ) वाटी ब) वाट्या क) वाटा ड) वाटे

**प्र4. घ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **2**

1) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

अ) चौकशी ब) चौघडी क) त्रैलोक्य ड) त्रिदल

2) या समासाचा विग्रह करताना 'किंवा, अथवा' अशी विकल्प दर्शक उभयान्वयी अव्यये वापरली जातात, अर्थाच्या दृष्टीने दोन पदांपैकी केवळ एकाच पदाची अपेक्षा असते अशा समासाला --------------- समास म्हणतात. (रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा)

अ) वैकल्पिक द्वंद्व ब) समाहार द्वंद्व

क) इतरेतर द्वंद्व ड) अव्ययीभाव

3) खालील शब्दाचा समास ओळखा.

एकवीस -

अ) वैकल्पिक द्वंद्व ब) इतरेतर द्वंद्व

क) द्विगू ड) अव्ययीभाव

**प्र5) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** **5**

मावशीच घर गावाबाहेर डोंगरपायथ्याशी. मध्ये एक नदीही लागायची. पूर्वी ही नदी पाण्यात उतरून चालत चालत पार करायला लागायची; परंतु आता कोकण रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. पुलाच्या एका बाजूने पायवाटही ठेवली होती. या पुलामुळे आता जाणं- येण सोपं झालं होत. निरंजन अभ्यासाची मनातल्या मनात उजळणी करत झपाझप चालला होता. वाटेत त्याला भला मोठा दगड पडलेला दिसला. कुणीतरी कामासाठी घेतला असेल आणि पुन्हा तसाच ठेऊन दिला असेल.निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. त्याला लोकांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचा भयंकर राग येई. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याच काय! असंच त्याचं म्हणणं. निरंजन पुलावर पोहचला तेव्हा साडेनऊ वाजून गेले असावेत. आता नऊ पन्नासची गाडी येईल, धाडधाड आवाज करत दिमाखात पुलावरून जाईल. कोकण गाडी किती छान दिसते; पण दिसते न दिसते तोच लगेच बोगद्यात शिरते. काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला? आपणही मोठे झाल्यावर गाडीतून फिरू, या विचाराने तो हुरळून गेला.

१) निरंजन कोणत्या विचाराने हुरळून गेला?

अ) कोकण गाडीने फिरण्याच्या ब) शाळेत जाण्याच्या

क) फिरायला जाण्याच्या ड) पुलावरून फिरण्याच्या

२) मावशीचे घर कुठे होते?

अ) शहरात    ब) नदीकिनारी    क) गावात    ड) डोंगरपायथ्याशी

३) निरंजन मनातल्या मनात कशाची उजळणी करत होता ?

अ) अभ्यासाची    ब) श्लोक पाठांतराची    क) भाषणाची    ड) पाढ्यांची

४) निरंजनला वाटेत काय दिसले ?

अ) रंगीबेरंगी फुले    ब) भला मोठा दगड.

क) मोठाली झाडे.    ड) पाण्याचा साठा

५) कुणीतरी कामासाठी घेतला असेल <u>आणि</u> पुन्हा तसाच ठेऊन दिला असेल.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

अ) शब्दयोगी अव्यय    ब) उभयान्वयी अव्यय

क) केवलप्रयोगी अव्यय    ड) क्रियाविशेषण अव्यय

६) 'हुरळून जाणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता ?

अ) हताश होणे    ब) हतबल होणे

क) आश्चर्य वाटणे    ड) मनोमन खूप आनंद होणे

प्र6) खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. **(कोणतेही ५)** 5

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार॥

फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार

१) श्रावण कशातून हसतो आहे ?

अ) नदी    ब) पर्वत    क) पाऊस    ड) फुलामुलांतून

२) कोणाचे स्वप्न साकार करायचे आहे ?

अ) नव्या पिढीचे    ब) कामगारांचे    क) श्रमिकांचे    ड) कवीचे

३) आभाळावर कशाचा ललकार घुमणार आहे?

अ) मांगल्याचा    ब) चैतन्याचा    क) तेजाचा    ड) उत्क्रांतीचा

४) 'उत्साह' या शब्दासाठी कोणता शब्द कवितेत आलेला आहे ?

अ) यंत्र   ब) चैतन्य   क) ललकार   ड) चक्र

५) आपला अधिकार कवीने कशावर सांगितला आहे ?

अ) उद्योगावर   ब) शेतावर   क) आभाळावर   ड) या देशाच्या मातीवर

६) मातीचे 'तनमन' कसे व्हावे ?

अ) मंगल   ब) शुद्ध   क) सुगंधी   ड) चैतन्यपूर्ण

## विभाग 'ब'

**प्र7. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) (3)**

1) लेखक वाईला कशासाठी गेले होते?
2) अब्दुल तपोवनात कधी जात असे?
3) बाबूकाकांनी पंताना कोणता सल्ला दिला?
4) लेखकांनी संस्कारकेंद्र म्हणून कशाचा उल्लेख केला आहे?
5) सरव ललितकलांचा पाया कोणता?

**प्र7. आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ३) (3)**

1) मी सुटकेसमधील ------- शाल काढली .
2) पंधरवडाभरात फक्त दोन वेळा ------- झाला .
3) अब्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना, मुलींना अगदी ------ वाटे .
4) भावे सर आम्हाला ---------- शिकवत.
5) निरंजनच्या वह्या पुस्तकांचा खर्च ------- गुरुजी करायचे.

**प्र7. इ) खालील प्रश्नांची उत्तरे 40 ते 50 शब्दांत लिहा. (कोणतेही 1) (3)**

1) कवितेने आपली कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?
2) "माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती." हे विधान स्पष्ट करा.
3) तुमच्या नजरेतून 'अब्दुलचे' व्यक्तिचित्र रेखाटा.

**प्र8. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) (3)**

1) कवीने जवळचा मित्र कोणास म्हटले आहे?
2) डोळे भरून पाहावे असे दृश्य कोणते?
3) चंद्राला कोणाची उपमा दिली आहे?
4) हरिणी चिंतेत का आहे?
5) घर घरातून कोण जन्म घेते असे कवीला वाटते?

प्र8. आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ३) (3)

1) धडाड्त्या तोफातून तुझे पाऊल ----------------------
2) झोतभट्टीत शेकावे ----------------------, तसे आयुष्य छान शेकले गेले. .
3) भुकेले वत्सरावे ---------------------- हुम्बरत धावे.
4) दुनियेचा विचार हरघडी केला, अगा ---------------------- झालो. .
5) जीव ---------------------- तरी, जीव किती हा लहान

प्र8. इ) खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासाहित स्पष्टीकरण करा. (3)

1) नामा म्हणे मेघा जैसा,
विनविती चातक तैसा

2) तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान

प्र8) ई) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) (2)

1) व्युत्पत्तिकोश म्हणजे काय?
2) अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला?
3) लेखक डॉक्टर अनिल काकोडकर यांना कोणत्या प्रक्रियेवर काम करण्यास सांगण्यात आले?

प्र9 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (8)

1) सूर्य मावळलाच नाही तर.....
**मुद्दे** - उजेडच उजेड --------- पृथ्वीचे तापमान वाढेल-------लोकांच्या वागणुकीत समानता नसेल----- सजीवांवर घातक परिणाम ----- कालचक्र थांबेल.

2) वृक्षाचे आत्मवृत्त.
**मुद्दे** - निसर्गातील एक महत्त्वाचा घटक --------एका छोट्या रोपटयापासून जन्म ---- वृक्षात रुपांतर -------- हवा, पाणी, ऊन, पाऊस हे सवंगडी ----- पक्ष्यांचा हक्काचा निवारा------- मानवाला आवाहन ----- वृक्षतोड करू नका ----- वृक्ष लागवड करा.

3) मी पाहिलेला कबड्डीचा सामना.
**मुद्दे** - एक महत्त्वाचा खेळ ----- सामना कधी,केव्हा झाला? एका संघात किती खेळाडू? ------- खेळाडूंचे कौशल्य ------- सामन्याचा शेवट.

प्र10. अ) खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा. (कोणतीही १) (7)

लोभी माणूस - तपश्चर्या - परमेश्वर प्रसन्न - एक वरदान देणे - 'सूर्य मावळेपर्यंत पळून परत येशील तितकी जमीन तुझी' - लोभ वाढतो.- पळतच राहतो - सूर्यास्त होतो - शेवटी थकून मृत्युमुखी पडतो.- अतिलोभाचे फळ - तात्पर्य.

किंवा

शिंप्याचे दुकान - एक हत्ती रोज दुकानासमोरून नदीला जाणे - शिंप्याच्या दुकानाजवळ थांबणे- दोघांत मैत्री होणे - शिंपी रोज एक गुलाबाचे फूल देणे - एके दिवशी शिंप्याने गंमतकरणे - फुलातून सुई टोचणे - हत्तीच्या सोंडेला टोचणे - हत्ती नदीवरून येताना सोंडेत चिखल आणणे - शिंप्याच्या कपड्यांवर उडवणे - शिंप्याला चूक समजणे. - तात्पर्य.

**प्र10. आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (5)**

साहिल /सविता नाडकर्णी, विनय विद्यालय, नागपूर, येथून शालेय प्रतिनिधी या नात्याने, माननीय आगार प्रमुख ,राज्य परिवहन मंडळ ,नागपूर यांना पत्र लिहून शाळेच्या सहलीसाठी बस उपलब्ध करून देण्याविषयी मागणी करणारे पत्र लिहितो / लिहिते.

**किंवा**

नीरज / नम्रता दळवी 240, सहकारनगर, परभणी येथून आपल्या राहत्या भागात कचरागाडी नियमित येत नसल्याने, तक्रार करणारे पत्र नगरपालिका परभणी यांना लिहितो / लिहिते.

विभाग ‘अ’

| | | | |
|---|---|---|---|
| प्र1. | | खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही १) | 5 |
| | 1. | ड) वरील सर्व गोष्टी. | |
| | 2. | क) जगा आणि जगू दया | |
| | 3. | अ) फुलांइतक्याच सहजतने जीवन फुलावे. | |
| | 4. | क) विधान 'A' आणि 'B' दोन्ही बरोबर. | |
| | 5. | ब) बेगमी करणे | |
| | 6. | ब) बंदिस्त | |
| | 7. | क) विचारवंत | |
| प्र2. | | पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुमार कृती करा. | 5 |
| | 1. | (i) चकोर | |
| | | (ii) सर्वकाळ सुखदाता | |
| | | (iii) पांखोवा | |
| | 2. | योगी पुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा. | |
| | 3. | पुढील शब्दांचा अर्थ लिहा. | |
| | | (i) पाणी, जीवन | |
| | | **(ii)** गोडपणा | |
| | | **(iii)** जीभ | |
| प्र3. | | सूचनेप्रमाणे उत्तरे सिहा. (कोणतेही-४) | 4 |
| | 1. | अ) सामान्य नाम, क्रियापद | |
| | 2. | ब) 'A, B' दोन्ही बरोबर. | |
| | 3. | ब) गोडवा, नम्रता, लबाडी ही भाववाचक नामे | |

प्र2. 2. (तक्ता):

| योगी पुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| (i) योगीपुरुष त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीला अंतर्बाह्य निर्मळ करतो. | (0 पाणी फक्त बाह्यांग निर्मळ करते. |
| (ii) योगीपुरुष स्वानंदतृप्तीचा अनुभव करून देतो. त्याच्या सहवासात आल्यानंतर मिळणारे सुख सर्वकाळ टिकून राहते. | (ii) पाणी प्यायल्यानंतर मिळणारे सुख क्षणिक असते. ते मर्यादित काळच टिकून राहते. |
| (iii) योगीपुरुषाचा सहवास सर्व इंद्रियांना संतुष्ट करणारा, शांतवणारा आहे. | (iii) पाण्याचा गोडवा फक्त जिभेपुरता मर्यादित असतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4. | अ) व्यक्तिवाचक | |
| | 5. | ड) तुटलेला पतंग खाली आला. | |
| | **ख)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** | **2** |
| | 1. | ड) भविष्यकाळ, भूतकाळ | |
| | 2. | अ) संकटात सापडू तेव्हाच देवाची आठवण होईल. | |
| | 3. | क) महाराष्ट्रात सर्वदूर भरपूर पाऊस पडत आहे. | |
| | 4. | ड) माणसाने नेहमी माणुसकी जपली. | |
| | **ग)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही-३)** | **3** |
| | 1. | ब) देवा, माझ्या पोराला यश दे! | |
| | 2. | ड) निराश होण्याचे काही कारण नाही. | |
| | 3. | क) फुकट दिले तर कोणी नको म्हणणार नाही. | |
| | 4. | ब) मोठ्यांचा आदर करावा. | |
| | **घ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | |
| | 1. | ड) प्रण- प्रतिज्ञा. | **2** |
| | 2. | ब) जल | |
| | 3. | ड) शत्रू | |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र4.** | **क)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **2** |
| | 1. | ड) मैत्री x शत्रुत्व | |
| | 2. | ड) देशद्रोही | |
| | 3. | क) निंदा | |
| | **ख)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **2** |
| | 1. | क) कोकीळ | |
| | 2. | अ) पक्षी | |
| | 3. | क) ढग | |
| | **ग)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **2** |
| | | ड) रात्र | |
| | | ड) अश्रू | |
| | | क) वाटा | |
| | **घ)** | **सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** | **2** |
| | 1. | अ) चौकशी | |
| | 2. | अ) वैकल्पिक द्वंद्व | |
| | 3. | ब) इतरेतर द्वंद्व | |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र5)** | | **खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** | **5** |
| | 1. | अ) कोकण गाडीने फिरण्याच्या | |
| | 2. | ड) डोंगरपायथ्याशी | |
| | 3. | अ) अभ्यासाची | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4. | ब) भला मोठा दगड. | |
| | 5. | ब) उभयान्वयी अव्यय | |
| | 6. | ड) मनोमन खूप आनंद होणे | |
| **प्र6)** | | **खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ५)** | **5** |
| | 1. | ड) फुलामुलांतून | |
| | 2. | अ) नव्या पिढीचे | |
| | 3. | ड) उत्क्रांतीचा | |
| | 4. | ब) चैतन्य | |
| | 5. | ड) या देशाच्या मातीवर | |
| | 6. | अ) मंगल | |
| | | **विभाग 'ब '** | |
| **प्र7)** | **अ.** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** | 3 |
| | 1. | लेखक वाईला विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून गेले होते. | |
| | 2. | अब्दुल तपोवनात संक्रांत आणि ज्येष्ठ पौर्णिमेला जात असे. | |
| | 3. | बाबूकाकांनी पंताना तेल आणि तळलेले पदार्थ सोडण्याचा सल्ला दिला. | |
| | 4. | लेखकांनी संस्कारकेंद्र म्हणून आई, शाळा आणि शिक्षक यांचा उल्लेख केला आहे. | |
| | 5. | 'कथा' हा सर्व ललितकलांचा पाया आहे . | |
| | **आ)** | **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ३)** | **3** |
| | 1. | मी सुटकेसमधील पुलकित शाल काढली. | |
| | 2. | पंधरवडाभरात फक्त दोन वेळा साखरभात झाला. | |
| | 3. | अब्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना,मुलींना अगदी देवदूतासारखा वाटे . | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4. | भावे सर आम्हाला <u>भौतिकशास्त्र</u> शिकवत. | |
| | 5. | निरंजनच्या वह्या पुस्तकांचा खर्च <u>भडसावळे</u> गुरुजी करायचे. | |
| | **इ)** | **खालील प्रश्नांची उत्तरे ४० ते ५० शब्दांत लिहा. (कोणतेही १)** | **3** |
| | 1. | **कवितेने आपली कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?**<br>**<u>प्रस्तावना:</u>** पाठ: रंग साहित्याचे, सर्व साहित्य प्रकारांची ओळख.<br>**<u>कवितेची वैशिष्ट्ये:</u>** छोटेसे रूप, आटोपशीर, मोजक्या शब्दात मोठा आशय. यमक, अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा, रूपक या अलंकारांनी सजलेली. शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते. कल्पनांचा सुंदर अविष्कार. संगीतकारांनी स्वरराज चढविला की गाण्यात रुपांतर होते. | |
| | 2. | **"माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती" हे विधान स्पष्ट करा.?**<br>**<u>प्रस्तावना</u> :** पाठ: उर्जाशक्तीचा जागर **<u>लेखक:</u>** डॉक्टर रघुनाथ माशेलकर, प्रतिकूल परिस्थितीतूनही जिद्दीने शिक्षण.<br>आई पोटापाण्यासाठी माशेल हे गाव सोडून लेखकांना घेऊन मुंबईत आली. गरिबीत मुलाला शिकविले. प्रतिकूल परिस्थितीत आईने धीर सोडला नाही. म्हणून "माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती,तर माझे सर्वस्व होती". असे म्हंटले आहे. | |
| | 3. | **'अब्दुलचे' व्यक्तिचित्र रेखाटा.**<br>**<u>प्रस्तावना</u>** : पाठ: चुडीवाला , **<u>लेखिका</u>** : जयश्री रुईकर माणुसकी आणि समाजऋणाची जाणीव असलेला सामान्य माणूस.<br>अब्दुल हा एक साधा, गरीब चुडीवाला होता.अब्दुलला तपोवानाबद्दल आत्मीयता होती. संक्रांत व जेष्ठ पौर्णिमेच्या दिवशी न चुकता अब्दुल तपोवनात जात असे, बांगड्या भरल्यावर तेथील स्त्रिया व मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून त्याला समाधान होत असे. शन्नोच्या रागाचीही पर्वा अब्दुलने केली नाही. अब्दुल तपोवनात कोणत्याही मोबदल्याची<br>अपेक्षा न करता जात असे. समाजाप्रती आपले काही कर्तव्य आहे, असे त्याला नेहमी वाटे. सत्काराच्या वेळी सुद्धा अब्दुलला दाजीसाहेबांनी स्वतः बोलावले. यावरून त्याचा साधा स्वभाव दिसून येतो. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **टीप - प्रस्तावनेला ०. ५ गुण आणि बाकीच्या उत्तराला १.५ गुण** | |
| **प्र8)** | **अ.** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३)** | **3** |
| | 1. | कविने जवळचा मित्र 'अश्रूंना' म्हंटले आहे. | |
| | 2. | डोळे भरून पाहावे असे दृश्य म्हणजे सैनिकाच्या विजयाची घोडदौड. | |
| | 3. | चंद्राला 'भाकरीची' उपमा दिली आहे | |
| | 4. | आपले पाडस बणव्यात तर सापडले तर नाही ना, या विचाराने हरिणी चिंतेत आहे. | |
| | 5. | घराघरांतून 'तेज' नवा अवतार घेऊन येते असे कवीला वाटते. | |
| | **आ)** | **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ३)** | **3** |
| | 1. | धडाड्त्या तोफातून तुझे पाऊल <u>जिद्दीचे.</u> | |
| | 2. | झोतभट्टीत शेकावे <u>पोलाद</u>, तसे आयुष्य छान शेकले गेले. | |
| | 3. | भुकेले वत्सरावे <u>धेनु</u> हम्बरत धावे. | |
| | 4. | दुनियेचा विचार हरघडी केला, अगा <u>जगमय</u> झालो. | |
| | 5. | जीव <u>ओवाळावा</u> तरी, जीव किती हा लहान. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | इ) | **खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** | **3** |
| | 1. | नामा म्हणे मेघा जैसा,<br>विनविते चातक तैसा ॥<br>**संदर्भ**- संतवाणी 'अंकिला मी दास तुझा'. संतकवी -संत नामदेव, विठ्ठलाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या भक्ताची मानसिकता.<br>**स्पष्टीकरण** - संत नामदेव विठ्ठलाला विनवीत आहे.चातक पक्षी जसा ढगाला विनवितो, तसाच मी तुला तुला विनवीत आहे, तू पण माझा सांभाळ कर.<br>**वैशिष्ट्ये:** मातृत्व ही भावना व्यक्त करण्यासाठी संत नामदेवांनी दिलेल्या विविध उपमा. | |
| | 2. | तुझ्या शौर्यगाथेपुढे<br>त्याची केवढीशी शान<br>**संदर्भ** : कविता - औक्षण **कवयित्री** - इंदिरा संत, सैनिकांबद्दल च्या भावना व्यक्त करणारी कविता.<br>**स्पष्टीकरण**- हे सैनिका तुझ्यावर जीव ओवाळून टाकला तरी आमचा जीव तुझ्या शौर्यापुढे काहीच नाही. आमच्या जीवाची शान अगदीच मामुली आहे.<br>**वैशिष्ट्ये** : सैनिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी भावनात्मक कविता. | |
| | ई) | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **2** |
| | 1. | अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्तीकोश होय. | |
| | 2. | अणुसंशोधनाचा पाया 'होमी भाभा' यांनी घातला. | |
| | 3. | डॉक्टर अनिल काकोडकर यांना 'मेटलायझिंग प्रक्रियेवर' काम करण्यास सांगण्यात आले. | |
| **प्र9)** | | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** | **8** |
| | | **निबंधात खालील गोष्टींवर लक्ष द्यावे -** | |
| | | - विषयज्ञान, तर्कशक्ती व त्याची सलग मांडणी. | |
| | | - मुद्देसुदपणा | |
| | | - आकर्षक आरंभ व शेवट. | |
| | | - म्हणी , वाक्प्रचार , काव्यपंक्ती यांचा योग्य वापर | |
| | | - हस्ताक्षर व शुद्धलेखन | |
| | | - विरामचिन्हांचा यथायोग्य वापर | |
| | | - उपयोजन कौशल्य / समपर्क शेवट | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **-वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे** | |
| **प्र10)** | **अ)** | **खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा. (कोणतीही १)** | **7** |
| | | **कथा लेखनात खालील गोष्टींवर लक्ष द्यावे -** | |
| | | - शीर्षक | |
| | | - विषयाची योग्य मांडणी, मुद्देसूदपणा व कल्पकता | |
| | | - प्रारंभ व शेवट आकर्षक, रंजकता. | |
| | | - म्हणी, वाक्प्रचार, यांचा योजकतेने वापर | |
| | | - आकर्षक शैली व संवाद | |
| | | - विरामचिन्हांचा यथायोग्य वापर | |
| | | - तात्पर्य | |
| | | **वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे** | |
| | **आ)** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक)** | **5** |
| | | **पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी** | |
| | | दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा. | |
| | | मायना - ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे संबोधित करावे. | |
| | | विषय- मोजक्या शब्दात असावा. | |
| | | मजकूर - मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना, पाल्हाळ नसावे, भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी. | |
| | | शेवट व स्वाक्षरी - पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पात्र पाठवणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता. | |